# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 12/11/2022 (षनिवार) सायंकाळ**

---

### अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

**पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील नेरला फाटा मौदा येथे १२/११/२०२२ चे ०३.०० वा. ते ०४.३० वा. सुमारास यातील पोलीस स्टेशन रामटेकचे पोलीस पथक पेट्रोलिंग डयुटी करीत असतांना, मुखबिरव्दारे माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन रामटेक वरुन मौजा नेरला गावाकडुन रामटेक मौदा रोडकडे जाणाऱ्या निळया रंगाच्या सोनालीका कंपनीचे ट्रॅक्टर मध्ये अवैध्यरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे, अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरुन यातील निळया रंगाचे सोनालीका कंपनीचे ट्रॅक्टर मौजा नेरला गावाकडुन रामटेक मौदा रोडकडे येत असतांना दिसल्याने रामटेक पोलीस पथकाने ट्रॅक्टर चालक आरोपी नामे– अमोल धनराज पिसे, वय २६ वर्षे, रा चोखाळा, ता. मौदा यास नेरला फाटा येथे शाहनिशा केली असता, सदर ट्रॅक्टर हे विना क्रमांकाचे असुन त्यामध्ये अवैधरीत्या रेती वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपी चालक/मालकास ट्रॅक्टर मधील रेतीचे परवान्याबाबत रॉयल्टी विचारणा केली असता सदर चालक/मालक यांनी रेती बाबत कोणतीही रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने सदर आरोपी ट्रॅक्टर चालक/मालक अवैधयरित्या विना परवाना शासनाचा कर चुकवुन रेती वाहतुक करतांना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन एक निळया रंगाचे सोनालीका कंपनीचे डी.एल.–४७/ आर. एक्स. ट्रॅक्टर विजय लक्ष्मी कंपनीची विना क्रमांकाची ट्रॉली असा किंमती अंदाजे ५,००,०००/–रू व एक ब्रास रेती किमंती ३०००/–रू असा एकुण किमती अंदाजे ५,०३,०००/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करून घेतला आहे.

सदर प्रकरणी सरकारत फिर्यादी नामे– पोलीस शिपाई ब. नं. २२२२ रविद्र सुखदेव मारबदे, वय ३६ वर्षे, पोलीस स्टेशन रामटेक यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन रामटेक करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. नरखेड** – अंतर्गत वार्ड क्र. ०३, नरखेड येथे दिनांक ११/११/२०२२ चे ०७.०० वा. ते ०७.१० वा. चे दरम्यान फिर्यादी नामे– सौ. बेबीबाई देविदास भगत, वय ५५ वर्ष, रा. वार्ड क्र १३ नरखेड यांचे राहते घरून नमुद घटना वेळी कोणीतरी अज्ञात ईसमाने त्यांची नातीण नामे–कु. अश्विनी राजेंद्र ढोले, वय १३ वर्ष, १० महिने हिला तिच्या अज्ञानपणाचा फायदा घेवुन अज्ञात कारणा करीता फुस लावुन पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन नरखेड करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**